स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
स्वररंग
विद्याविकास
दूरध्वनी क्रमांक
०२०२५६२२६८०
०२०२५६२२६८८
०२०२५६२२६८९
०२०२५६२२६९०
०२०२५६२२६९१

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११००७

फॅक्स क्रमांक २५६०११५४

---

संदर्भ : रासेयो/२०२३—२४/४९१ दि. ०९/१२/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो व विविमं संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे व पिंपरी चिंचवड शहर परिसरातील
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

**विषय : National Book Trust, India यांचेमार्फत आयोजित 'शांतता... पुणेकर वाचत आहेत!' उपक्रमाच्या पूर्वनियोजन सभेस स्वयंसेवक पाठविणेबाबत**

महोदय,

उपरोक्त संदभीर्य विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया (शिक्षण मंत्रालय, भारत सरकार) ६७ वर्षाहून अधिक काळापासून देशात पुस्तकांच्या प्रचारासाठी आणि वाचनाची सवय वाढविण्यासाठी काम करत आहे. सदर संस्थेद्वारे देशभरात विविध पुस्तकांशी संबंधित पुस्तक मेळावे आणि प्रदर्शने, साहित्यिक कार्यक्रम, परिसंवाद आणि परिषद, मुलांसाठी उपक्रम, अनुवाद कार्यशाळा, प्रकाशकांचे संमेलन, प्रदर्शन व्हॅनद्वारे पुस्तक परिक्रमा अशा प्रकारचे उपक्रम राबविते.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत विशेषत: विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात 'पुणे बुक फेस्टीवल' दि. १६ ते २४ डिसेंबर २०२३ या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयात आयोजित करण्यात येणार आहे. ह्या आयोजनामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळाचा आणि विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचा सक्रिय सहभाग आहे. या दरम्यान दि. १४ डिसेंबर २०२३ रोजी, 'शांतता... पुणेकर वाचत आहेत!' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर उपक्रमाच्या पूर्वनियोजन सभेकरिता आपल्या महाविद्यालयातील रासेयो आणि विविमं चे १० विद्यार्थी दि. ११ डिसेंबर २०२३ रोजी, दुपारी ०३.०० वाजता फर्ग्युसन महाविद्यालयाच्या ॲम्पीथिएटर सभागृहात उपस्थित राहण्याविषयी कळवावे.

कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना